# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.06.2025** **वार- रविवार**

---

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणी वरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. आंतरराष्ट्रीय योग दिन, आणीबाणीला झालेली 50 वर्ष, स्वच्छता अशा विविध विषयांवर त्यांनी भाष्य केलं. नुकत्याच झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाविषयी बोलताना पंतप्रधानांनी पुण्याचे रमेश खरमाळे वन संवर्धनासाठी करत असलेल्या कार्याची माहिती श्रोत्यांना दिली.

**<u>मोहोळ</u>**

अहमदाबाद विमान अपघाताची, विमान अपघात अन्वेषण संस्था सर्वंकष चौकशी करेल, असं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितलं. एका खासगी वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात ते आज पुण्यात बोलत होते. या अपघातामागे घातपाताची शक्यता सध्यातरी आढळून आलेली नाही, असं ते म्हणाले.

**<u>अजितपवार</u>**

सारथी संस्थेच्या कामाला गती देण्यात येत असून त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात दिलं. युपीएससी आणि एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सारथी संस्थेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार पवार यांच्या हस्ते करण्यात आला; त्यावेळी ते

बोलत होते. उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आगामी काळात सामाजिक जबाबदारी म्हणून नवीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावं असं आवाहन त्यांनी केलं.

**पंकजभोयर**

सध्या देशात मूल्याधिष्ठित शिक्षणाची गरज आहे, असं मत शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. एमआयटी संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विश्वनाथ कराड अध्यात्म-विज्ञानाधिष्टीत वैश्विक शिष्यवृत्तीमधील सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते  बोलत होते. बालभारतीचे विशेष अधिकारी डॉ.अजयकुमार लोळगे यावेळी उपस्थित होते.

**पत्रकारसंघ**

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी दैनिक सकाळचे ब्रिजमोहन पाटील यांची तर सरचिटणीसपदी दिव्य मराठीचे मंगेश फल्ले यांची आज निवड झाली. उपाध्यक्षपदी महाराष्ट्र टाइम्सचे राजा गायकवाड आणि साम टीव्हीचे  सागर आव्हाड यांची तर खजिनदारपदी दैनिक केसरीचे दिलीप तायडे यांची निवड झाली आहे.

**परिषद**

आधुनिक काळात बौद्धिक संपदेचं व्यावसायिकीकरण करणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन बौद्धिक संपदा कायदातज्ज्ञ ॲडव्होकेट आनंद माहूरकर यांनी केल. दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंह्व ऑफ इंडियाच्या पुणे शाखेच्या वतीने आयोजित 'एमएसएमई महोत्सवा'त ते बोलत होते.

**रथयात्रा**

इस्कॉनच्या पुणे शाखेतर्फे आज पुण्यात श्री जगन्नाथ रथयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. हरे राम हरे कृष्णा...च्या जयघोषात निघालेल्या या रथयात्रेत मोठ्या प्रमाणावर भाविक सहभागी झाले होते.

**<u>पालखी</u>**

पुण्यातील श्री साईबाबा पालखी सोहळा समितीच्या वतीने पुणे ते शिर्डी पायी पालखीला आजपासून सुरुवात झाली. नऊ जुलै रोजी गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला ही पालखी शिर्डीमध्ये पोहोचेल. पालखी मार्गावर साई भक्तांकडून व्यसनमुक्तीचा संदेश दिला जात आहे.

**<u>वृक्षारोपण</u>**

वृक्षलागवड करणं हे प्रत्येक व्यक्तीचं केवळ सामाजिकच नाही, तर नैतिक कर्तव्य आहे, असं मत केंद्रीय राखीव सुरक्षा दलाचे पोलीस उपमहानिरीक्षक वैभव निंबाळकर यांनी व्यक्त केलं आहे. तळेगाव दाभाडे इथल्या केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या केंद्रात राबवलेल्या वृक्षारोपण उपक्रमाच्या समारोप समारंभात ते काल बोलत होते. जागतिक पर्यावरण दिनापासून सुरू झालेल्या या मोहिमेअंतर्गत स्थानिक प्रजातींची सुमारे ५ हजार रोपं लावण्यात आली. त्यांचं संगोपन करण्याचा संकल्पही यावेळी घेण्यात आला.

**<u>दूध अनुदान</u>**

राज्य सरकारच्या दूध अनुदान योजने अंतर्गत अनुदानाची 28 कोटी 63 लाख 57 हजार रुपयांची रक्कम 19 जून रोजी एक लाख 68 हजार 848 शेतकऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. पुणे दुग्धव्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड यांनी आज ही माहिती दिली. उर्वरित सहा कोटी 93 लाख रुपयांचं अनुदान फेरतपासणीनंतर वितरित करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>बाजार समिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून ऐंशी ते नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने भेंडी,गवार,शेवगा,कोबी,फ्लॉवर आणि सिमला मिरची महागले तर टोमॅटोच्या भावात घसरण झाली. या आठवड्यात पालेभाज्यांची आणि फळांची आवक घटली असून भावात वाढ झाली. फुल बाजारातही मालाला फारसा उठाव नसून फुलांचे दरही घसरले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशतः ढगाळ होतं; उद्याही शहर परिसरात आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडेल तर घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**